**(क) सामाजिक संशोधनातील अडथळे :**

सामाजिक संशोधन हे मानवी सामाजिक प्राण्याविषयी, मानवी समाजाविषयीचे असते. हे संशोधन मानवाकडून होत असते. हा मानव कोणत्या ना कोणत्या समाजाचा सदस्य असणे स्वाभाविक असते. त्या समाजाच्या मुल्यांचा, सांस्कृतीक परंपरांचा प्रभाव पडणे स्वाभाविक असते. संशोधन हे स्थल, काल सापेक्ष असते. मानवी समाज सर्वत्र सारख्या जीवनमानाचा किंवा समूह स्वभावाचा नाही यामुळे सामाजिक शास्त्रांना वस्तुनिष्ठ अध्ययनाकरिता अनेक कसोट्या पार कराव्या लागतात. मानवी समाजाच्या विविधतेतील समान घटकांचा शोध घेऊन अध्ययन करावे लागते हे अध्ययन करत असताना खालील अडचणींना सामाजिक शास्त्राच्या संशोधकांना सामोरे जावे लागते.

**१) वैज्ञानिक पद्धतीच्या वापराबाबत संभ्रम :**

मानवी समाजाच्या अध्ययनात शास्त्रीय वैशिष्ट्यांचा पुर्णपणे समाविष्ट करून घ्यावयाचा आग्रह धरणे मानवालाही अन्यप्राणी व पदार्थांना समकक्ष मानणे आहे. अन्यप्राणी व पदार्थांप्रमाणे मानवाचा यंत्रवत पद्धतीने अभ्यास केल्यास मानवी जीवनाच्या जटिल, मौल्यवान, अस्मितापूर्ण व व्यवच्छेदक अशा पैलूंकडे आपले दुर्लक्ष होईल व त्यामुळे मानवी जीवनातील अद्वितीय व मौल्यवान आणि जीवनाला अर्थ देणाऱ्या बाबीच आपल्या अध्ययनातून गाळल्या जातील. म्हणूनच नैसर्गिक शास्त्रांची वैशिष्ट्ये सामाजिक शास्त्रांना समान असावीत हा आग्रह चूकीचा आहे असे काही विचारवंताचे मत आहे. तर काहींचा आग्रह आहे की, नैसर्गिक शास्त्राप्रमाणे आपण निष्पक्षता व वस्तुनिष्ठता राखू शकतो. या बाबीमुळे संशोधकांच्यामध्ये संभ्रम असल्याचे स्पष्ट होते. त्याचबरोबर संख्यात्मक अध्ययन पद्धतीचा उपयोग करावयाचा की, गुणात्मक पद्धतीचा उपयोग सामाजिक संशोधनात करावयाचा यात ही संभ्रम असल्याचे दिसते.

**२) समस्या सुत्रणातील अडचण :**

सामाजिक संशोधनात प्रमुख अडचण म्हणजे कोणत्या समस्येची निवड योग्य राहील याबाबत संशोधक संभ्रमात असतो. संशोधकाच्या स्वत:च्या आवडी-निवडी, सांस्कृतिक पार्श्वभूमी, मूल्य हे आपल्या विषय प्रभावित करत नाहीत ना हे पाहिले पाहिजे. संशोधकाला मिळणारा वेळ, लागणारा खर्च याचा मेळ घालावा लागतो. संशोधकाला एखाद्या विषयात रूची असते पण त्याला मार्गदर्शन करणाऱ्या अभ्यासकला त्या विषयात रूची असत नाही. इच्छा नसतानाही संशोधक विषयाची निवड करतो. त्याचबरोबर भारतामध्ये संशोधनाची आर्थिक

बाबीशी घातलेली सांगड सामाजिक संशोधनाला घातक आहे. यामुळे संशोधक पटकन ज्या विषयात संशोधन होईल तो विषयाची निवड करतो. त्या विषयाच्या दर्जाची तो चर्चाही करीत नाही.

**३) भावनात्मकतेचा प्रभाव :**

संशोधकाने योग्य विषयाची व पद्धतीची निवड केली म्हणजे संशोधन योग्यरितीने पूर्ण होईल व झाले आहे असे समजण्याची चूक करता कामा नये. सामाजिक शास्त्रांचा अभ्यासविषय मानव म्हणजे तो स्वत:च असतो. समाजाचा एक सभासद याअर्थी सामाजिक शास्त्रज्ञास काही आवडी-निवडी असतात, काही मूल्यांवर त्याची जीवापाड श्रद्धा असते. भावनिक तटस्थता वा अलिप्तता राखून केलेल्या अध्ययनामुळे त्याला महत्त्वपूर्ण वाटणाऱ्या मूल्यांची व श्रद्धांची पाळेमुळे त्याच्या अध्ययनामुळे उध्वस्त होण्याचा संभव असतो. जीवन-निष्ठाच नष्ट झाल्या तर जगण्यासारखे तरी काय राहते? याच कारणासाठी सामाजिक जीवनाच्या अध्ययनात अलिप्त वृत्ती राखणे सामाजिक शास्त्रज्ञांसाठी जवळ-जवळ शक्य नसते. चालीरीती, प्रथा, परंपरा मूल्ये, मापदंड व संस्थाकृत वर्तन प्रकारांनी बनलेला जीवनबंध आपल्या विचारांनाही गवसणी घालणारा ठरतो. जीवनबंधात समाविष्ट प्रथा वा मूल्यपासून स्वत: पृथक करून त्यांचे अध्ययन करणे ही एक कठीण बाब आहे. उदा.ग्रामीण किंवा शहरी सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभलेला संशोधक जेंव्हा आदिवासी समाजाचा अभ्यास करताना समता, स्वातंत्र्य, बंधुता हा त्याला कळलेल्या अर्थाच्या प्रभावातून आदिवासी समाजाचे अध्ययन केले तर हा प्रभाव भावनात्मक समजावा.

**४) स्वत:च्या ज्ञानासंबंधी व बुद्धीमतेसंबंधी भ्रम :**

संशोधन समस्येविषयी संशोधकाजवळ असणारे सर्वसामान्य ज्ञान हे अंतिम ज्ञान आहे अशी धारणा असते. या सामान्य ज्ञानाच्या आधारावर संशोधक प्राप्त निष्कर्षाचे मोजमाप करीत असतो. संशोधक बुद्धीवादी असल्यामुळे आपल्या बुद्धीविषयी भ्रमजन्य असतो, त्याला अहंकार असतो की, मी काढलेले निष्कर्ष हेच सत्य आहेत. जो सिद्धांत त्याच्या ज्ञानाशी सुसंगत नाही तो त्या सिद्धांताला मान्यता देत नाही. संशोधकाने आपल्या जवळील ज्ञानाची वर्तमानात तपासणी करून घेणे आवश्यक असते. आपल्या जवळील असणाऱ्या ज्ञानाविषयी अहंकारी असता कामा नये. परंतु सत्य व नविन ज्ञान संशोधक किती प्रमाणात स्विकारतो हे संशोधनासाठी मारक किंवा तारक ठरत असते.

**५) पुर्वग्रहाचा प्रभाव :**

सामाजिक शास्त्रज्ञाच्या दुसऱ्या व्यक्तींशी असणाऱ्या भावना व हितसंबंधाची जी गुंतवणूक झालेली असते. तिच्यामुळे सामाजिक शास्त्रज्ञास सामाजिक स्थितीचा अलिप्तपणे विचार करता येणे शक्य नसते व म्हणूनच सामाजिक शास्त्रामधून वस्तुनिष्ठतेचा अभाव आढळतो, पण हितसंबंधांच्या किंवा भावनांच्या प्रभावामुळे शास्त्रज्ञांची वृत्ती पुर्वग्रहदुषित किंवा पक्षपाती होईलच असे नाही. अडचणीवर मात करण्याऐवजी ज्यांच्यापासून पळ काढण्यातच ज्यांना समाधान वाटते तेच लोक पुर्वग्रहाचे सावज बनतात व अशाच स्थितीत त्यांचा दृष्टिकोन पूर्वग्रहित राहण्याची जास्त शक्यता असते, हे विसरणे शक्य नाही. आपल्या इच्छेप्रमाणे सामाजिक घटनांना वळण देणे कठीण असते. जिथे एखादी व्यवहार्य योजना संचलित करावयाची असते तिथे अशा योजनेत उपयोगात येणाऱ्या साधन संपत्तीचे वास्तववादी व वस्तुनिष्ठ मोजमाप आवश्यकच असते. ज्या ठिकाणी परिणामकारक अशी कोणतीच योजना संचलित करणे शक्य नसते. तिथेच पूर्वग्रहांचा कल्पविलास परवडणार नाही. उदा.शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे घेता येईल. शेतकऱ्यांच्या अध्ययन करणारे संशोधक एक तर आर्थिक घटकांना आत्महत्येचे केंद्रभूत मानतात नाही तर राजकीय घटकांना यावर आधारीत अध्ययन हे पुर्वग्रह असण्याची जास्त शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या अध्ययनात – सामाजिक – मानसशास्त्रीय, सामाजिक, भौगोलिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक अशा विविध घटकांचा विचार करावा लागेल तेंव्हाच ते अध्ययन सक्षम अध्ययन होईल नाहीतर 'राजकीय विषय' म्हणून कायमस्वरूपी चर्चेत राहील.

**६) बाह्य हितसंबंधाचा प्रभाव :**

संशोधनामध्ये अनेकवेळा बाह्यहितसंबंधाचा स्वार्थ असतो हा स्वार्थ संशोधकाला योग्य प्रकारे मदत करत नाही किंवा संशोधनामध्ये अडथळा आणण्याचा प्रयत्न केला जातो. जेणेकरून संशोधन होऊन सत्य बाहेर पडूच नये अशी त्यांची मानसिकता असते. आणि अशा स्वार्थी हितसंबंधामुळे विशिष्ट क्षेत्रातील संशोधन होत नाही. उदा.जुगार अड्डे, दारूच्या भट्टया चालवून जगणारा समूदाय, वेश्यांचा अभ्यास, गुन्हेगारी टोळ्यांचा अभ्यास, वाळू माफियांचा अभ्यास करण्यात काहींचे व्यावसायिक हितसंबंध गुंतलेले असतात या शक्ती विरोध करतात. यामुळे सत्य उजेडात येऊ देत नाहीत. अशाप्रकारे बाह्य हितसंबंधाचा सामाजिक संशोधनात हस्तक्षेप होऊन वस्तुनिष्ठ तथ्याअभावी स्वाभाविक समाजवास्तव प्रकाशात आणता येत नाही.

**७) संशोधन कार्य पूर्ण करण्याची घाई :**

एखाद्यावेळी तत्कालिन समस्या निर्माण होतात. या समस्यांचे तातडीने निराकरण करून निर्मुलनासाठी तात्काळ उपाययोजनांची आवश्यकता भासते. अशावेळी संशोधकावर दबाव असतो की, हे संशोधन लवकर पूर्ण व्हावे. अशावेळी संशोधक संशोधन घाईत पूर्ण करतो. या संशोधनातून प्राप्त निष्कर्ष पुर्णत: निकोप असतील असे नाही. यामुळे वास्तविक ज्ञान समाजापासून दूर राहण्याची शक्यता असते.

**८) संशोधन आणि संशोधकांच्या संबंधाचा प्रभाव :**

या संदर्भात आपण भारतीय संशोधन आणि संशोधक यांच्या संदर्भातील विचार करणार आहोत. एकदा एका व्याख्यानात भालचंद्र मुणगेकर यांनी स्पष्टपणे म्हटले होते की, भारतीय विद्यापीठातील संशोधन हे टी.बी. झालेल्या रोग्याप्रमाणे आहे. म्हणजे विद्यापीठांतील संशोधन हे निकृष्ट दर्जाचे आहे. संशोधनाचा संबंध हा आर्थिक घटकाशी संबंधी निर्माण झाला आहे. कारण इतके शोधनिबंध लिहिले तर एवढी वेतनात वाढ होईल, पीएच्.डी. प्राप्त केली तर नोकरी व वेतनवाढी मिळतील. म्हणून संशोधकाचा हेतु हा फक्त नियम व अटी पूर्ण करण्यासाठीच हेतू राहतो यामुळे वस्तुनिष्ठ अध्ययन होत नाही.

सामाजिक संशोधनातील वरील अडथळ्यांची चर्चा करता असे दिसते की, मानवी समाजाचा अभ्यास हा एक मानव करत असतो. स्वाभाविकपणाने वस्तुनिष्ठ व वास्तविक ज्ञान मिळविण्यात अडचणी निर्माण होतात. पण याचा अर्थ असा नाही की, मानव हा मानवी समाजाचा अभ्यास करतो म्हणून वस्तुनिष्ठ ज्ञान प्राप्त होणार नाही. वरील चर्चा ही संशोधन करताना संशोधकाला सावध करण्यासाठी आहे. वरील अडथळ्यांचा आपल्या संशोधनात कमीत कमी प्रभाव राहील याकडे लक्ष देणे आवश्यक आहे म्हणजे जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ संशोधन होण्यास मदत होईल.